जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिक्षकभरतीचा प्रश्न महत्त्वाचा



उच्च शिक्षणाला पोषक असलेल्या निर्णायक नवीन विद्यापीठ कायदा करण्यात राज्य सरकारने संमत केला ही एक चांगली गोष्ट झाली. तसेच प्रलंबित असलेला राष्ट्रीय उच्चशिक्षण अभियानाचा प्रश्न मार्गी लागला. चॉइस बेस क्रेडिट ही संकल्पना अधिक स्पष्ट झाल्यामुळे विद्यापीठाला आर्थिक निधी मिळणेही सुलभ झाले. गेल्या तीन वर्षात शिक्षण क्षेत्रात झालेल्या डिजिटल क्रांतीचे श्रेयही सरकारच्या धोरणांना द्यावे लागेल. यामुळे विद्यार्थ्यांना विविध बाबत सुलभता आली. करिअरबाबत विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसायाच्या अनेक संधी या डिजिटल क्रांतीमुळे निर्माण झाल्या. एकीकडे सरकारच्या तीन वर्षाच्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्राला उभारी देणाऱ्या या गोष्टी घडल्या असल्या तरी शिक्षकभरतीचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. फीसंदर्भातील काही निर्णयही तातडीने घेणे आवश्यक आहे. परीक्षा नियोजन आणि निकाल जाहीर होण्याचा कालावधी यातील गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्याबाबत नियोजन अपेक्षित आहे. शिक्षक भरतीसंदर्भातील दिरंगाई मारक ठरत आहे.

**-डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू शिवाजी विद्यापीठ**

2 NOV 2017
Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK launches contest for e-book portal name

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has launched a contest for a catchy name for its e-book portal. The last date to send in entries is November 3.

The SUK VC Devanand Shinde inaugurated the university's e-book store in June this year. Various publications and books are available on the e-book store.

According to SUK officials, two names — E-book SUK and Shiv Ganga — were suggested in earlier meetings to decide on the portal name. However, the competition was organised for more options.

The official said the competition was first organised from September 14 to 22, but because of the low response, the last date was extended to November 3," the official said.

Students or the teaching and non-teaching officials can submit their entries with their names and without any fee. "Winners will get Rs 1,000 and a few books," the official said.

According to the official, the Shivaji University's publication department has published quality work till date. The demand for these books has been put up on the e-store and soon all the books will be brought on the e-store.

D T Shirke SUK's acting pro VC had told TOI that it was avid readers across the state and country said that books published in the SUK were unavailable anywhere except for the SUK campus. With the launch of the e-store, readers now have the opportunity to order the book they want online.

He had added that an online payment gateway was launched for book lovers, which has facilitated a smooth book-buying experience There are thousands of titles available from the university's press department and one can order the book from the e-store on the SUK website www.unishivaji.ac.in.



TOI

## Over 1.200 nomination forms sold

Over 1,200 forms have been sold for the nomination of various academic bodies of the Shivaji University, Kolhapur (SUK). The last date of nomination was on Tuesday, while voting will take place on November 17 for the respective bodies.

According to an SUK official, the scrutiny of received forms will be done on Thursday at the university campus and the updated schedule will be available on www.unishivaji.ac.in.

SUK registrar Vilas Nandavadekar said that under the Maharashtra Public Universities Act 2016, various academic bodies will be elected via elections on November 17. The election notice was issued on October 22 and Saturday is the last day to withdraw nominations. The list of the eligible candidates will be published on Monday.

According to registrar, the voting will take place between 9 am and 5pm on November 17 and results will be announced on November 20.

He added that all details regarding the election is available on the university website under the 'University Election 2017' section.

The graduate constituency elections in the Shivaji University's senate could prove to be a game changer for leading political parties this election season. The elections will be held two years after the term of the previous bodies ended in August 2015. With this, elected representatives will again be part of the administrative and academic bodies of the university.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 NOV 2017

पुढारी

# निम्मी अभ्यासमंडळे निवडणूक रिंगणातून बाहेर ?

**कोल्हापूर : विजय पाटील**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध गटांच्या १४६ जागांसाठी १७ नोव्हेंबरला निवडणूक होत आहे. परंतु निम्मी अभ्यासमंडळे निवडणुकीआधीच रिंगणातून बाहेर पडणार असल्याचे चित्र आहे. एकूण ४५ अभ्यासमंडळांसाठी निवडणूक कार्यक्रम अपेक्षित होता. प्रत्यक्षात बावीसहून कमी अभ्यासमंडळांची निवडणूक होईल असे चित्र आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या निवडणुकीचे वातावरण तापले आहे. विविध गटांत इच्छुकांनी ४४६ इतक्या मोठ्या संख्येने



शिवाजी विद्यापीठ निवडणूक

अर्ज दाखल केले असल्याने मोठी चुरस रंगणार आहे. हे चित्र एका बाजूला असताना ४५ अभ्यासमंडळामधील निम्मी मंडळे रिंगणातून बाहेर पडणार असल्याने

- बारा अभ्यासमंडळांसाठी एकही मतदार नोंद नाही.
- सात अभ्यासमंडळांमध्ये उमेदवारी अर्ज नाही.
- तीन अभ्यासमंडळांमध्ये एकच अर्ज.

फारशी चुरस दिसत नाही. कारण यातील बारा अभ्यासमंडळांसाठी एकही मतदार नोंदणी न झाल्याने या गटात निवडणूक होणार नाही. आता राहिलेल्या ३३ अभ्यासमंडळांतील सात ठिकाणी एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही. यासह तीन अभ्यासमंडळांसाठी एकच अर्ज

## अभ्यासमंडळे म्हणजे ?

अभ्यासमंडळे ही विद्या परिषदेच्या (अॅकेडेमिक कौन्सिल) अखत्यारित येतात. शैक्षणिक क्षेत्रात विद्या परिषदेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण अभ्यासक्रम तयार करणे, नवे बदल सुचवणे असे महत्त्वाचे निर्णय या माध्यमातून घेतले जातात. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अभ्यासमंडळांचे काम महत्त्वाचे असते.

आला असल्याचे समजते. यामुळे जवळपास बावीस अभ्यासमंडळे आपोआप निवडणुकीच्या रिंगणाबाहेर गेली आहेत.

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या कायद्यानुसार उमेदवारांसाठी जुने निकष बदलून सुधारित केले आहेत. उच्च शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहाचा विचार करून सुधारित निकष निश्चित केले आहेत. याचा फटका अनेक इच्छुकांना बसला आहे. त्यामुळे अनेक गटांत उमेदवारी अर्ज आले नाहीत. आता छाननी प्रक्रियेतही काही अर्ज बाद होण्याची शक्यता आहे. छाननीत जर आणखी काही अभ्यासमंडळांमधील अर्ज बाद ठरले तर निवडणुकीसाठीचे आणखी गट कमी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
2 NOV 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठ अधिसभा निवडणूक : उच्चांकी ४४६ अर्ज

# अधिकार मंडळासाठी तिरंगी लढती

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या १४६ जागांसाठी ४४६ उमदेवारी अर्ज दाखल झाले आहेत. सुरुवातीला विद्यापीठ विकास आघाडी विरुद्ध सुटा अशी लढत होईल असे चित्र होते. मात्र, दाखल अर्ज, रिंगणातील संघटना लक्षात घेता अधिकतर गटांमध्ये तिरंगी लढत होण्याचीच शक्यता आहे.

अर्जांची छाननी आज, गुरुवारी होईल. त्यानंतर शनिवारी (दि. ४) माघारीची मुदत आहे.

नोंदणीकृत पदवीधर गटासाठी दहा जागा असून, त्यासाठी १२३, अभ्यास मंडळे - विभागप्रमुख, प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, विद्या परिषद शिक्षक गटांमधील जागांच्या तुलनेत तिप्पट अर्ज दाखल झाले आहेत. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती, विद्यापीठ विकास मंच, शिवाजी युनिव्हर्सिटी पी. जी. टिचर्स असोसिएशन (सुप्टा), आदी संघटनांनी या निवडणुकीसाठी मतदार नोंदणीपासून कसून तयारी केली आहे. त्यामुळे मोठी चुरस रंगणार आहे. यावर्षीची निवडणूक नवीन विद्यापीठ कायद्यानुसार होत आहे. त्यामुळे निवडणूक लढविण्याच्या पात्रतेमध्ये अनेक बदल झाले आहेत.

२ NOV 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता लक्ष छाननीकडे

## सात अधिकार मंडळांच्या जागेचा निर्णय निवडणूक अधिकारी घेणार



प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली. गुरूवारी अर्जांची छाननी करून तात्पुरती यादी जाहीर केली जाणार आहे. तर ४ नोव्हेंबरला अर्ज माघार घेण्यात येणार आहेत. त्यामुळे छाननीत कोणाचा पत्ता कट होणार याकडे विद्यापीठ परिक्षेत्राचे लक्ष लागले आहे. सुटाच्या विरोधात विद्यापीठ विकास आघाडीने बांधलेली मोट धूसर होण्याची शक्यता असल्याने सर्वच स्तरावर दबावतंत्र सुरू झाले आहे.

विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी शेवटच्या दिवशी १ हजार २३८ अर्जांची विक्री तर ४४६ अर्ज दाखल झाले आहेत. सात अभ्यासमंडळासाठी एकही अर्ज दाखल न झाल्याने निवडणूक अधिकारी या जागांबाबत निर्णय घेणार आहेत. गुरूवारी अर्जांची छाननी होणार आहे. शनिवारी अंतिम यादी जाहीर झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने प्रचाराला सुरुवात होणार आहे. अनेकांनी बंडखोरी करीत स्वतंत्रपणे अर्ज दाखल केले आहेत.

**तिरंगी किंवा चौरंगी निवडणूक होण्याची शक्यता**

विद्यापीठ विकास आघाडी विरूध्द सुटा अशी निवडणूक होण्याची शक्यता होती. मात्र विद्यापीठ विकास आघडीतून बाहेर पडून विद्यापीठ विकास मंचच्या बॅनरखाली काही संघटनांनी आपला सबता सुभा मांडला आहे. शनिवार ४ नोव्हेंबरपर्यंत काही तडजोड झाली तर एकत्र येण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. तर सुटा संघटनेमध्येही अंतर्गत वाद सुरू आहेत. त्यामुळे सुटातील वादावर पडदा पडणार की हा वाद चव्हाट्यावर येणार याचे चित्र अर्ज माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे.

तसेच शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी संघटनेने पदवीधरच्या जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे इतर संघटनेतील नाराज उमेदवार या संघटनेच्या संपर्कात आहेत. इच्छुकांची संख्या वाढल्याने बहुतेक विभागात स्वतंत्र पॅनल होण्यासारखी स्थिती आहे. विद्यापीठ विकास मंचला प्रत्येक जागेवर आपला प्रतिनिधी हवा आहे. विद्यापीठ विकास आघाडीच्या नेत्यांनी जागांचा फॉर्म्युलसाठी व्यूहरचना सुरू केली आहे. तसेच अनेक जागेवर अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरून प्रचाराला प्रारंभ केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2017
पुण्यनगरी

# उमेदवारीसाठी रस्सीखेच

## शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणूक : आज अर्ज छाननी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसह अन्य अधिकार मंडळांच्या सदस्यत्वाच्या १४३ जागांसाठी ४४६ अर्ज दाखल झाले आहेत. सुटा विरोधात अन्य संघटना अशी दुरंगी लढत यंदा होणार असल्याने उमेदवारी मिळविण्यासाठी रस्सीखेच सुरू आहे, तर काहींनी निवडणूक लढवायचीच, असा निश्चय करत प्रचाराला सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसह अन्य अधिकार मंडळांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडण्यात येणार आहेत; मात्र यावेळीच्या निवडणुकीसाठी ४४६ अशा विक्रमी संख्येने अर्ज दाखल करण्यात आले आहेत. सुटा विरोधात इतर सर्व असे चित्र उभे राहिले आहे. त्यामुळे प्रचंड संख्येने असलेल्या उमेदवारांनी उमेदवारी मिळविण्यासाठी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे, तर आघाडी करताना कोणाला किती जागा सोडायच्या यावरूनही काथ्याकूट सुरू आहे. उमेदवारी मिळाली नाही, तरी कोणत्याही परिस्थितीत लढायचेच, असा निर्धार करून काहींनी प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यामध्ये आपल्या मतदारांना लक्ष करून प्रत्यक्ष भेटीगाठींना सुरुवात केली आहे. त्यामुळे सुरुवातील दुरंगी लढत, असे चित्र उभे राहत असले तरी कांही गटांसाठी तिरंगी, तर काही ठिकाणी चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे. गुरुवार, दि. २ रोजी अर्ज छाननी होणार आहे. त्यामुळे उमेदवारांचे लक्ष अर्ज छाननीकडे लागले आहे. शनिवार, दि. ४ ही अर्ज माघारीची मुदत आहे. त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'सिनेट'साठी आज छाननी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या (सिनेट) सदस्यत्वासाठी १७ नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीच्या रिंगणात अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीनंतर ४४६ उमेदवारांमध्ये सर्वच गटांत मातब्बरांचा समावेश आहे. त्यामुळे ग टप्रमुखांना आता माघारीसाठी कुणासमोर फासे फेकायचे याचे गणित मांडावे लागणार आहे.

दरम्यान, गुरुवारी (ता. २ नोव्हेंबर) अर्जांची छाननी आहे. छाननीत कुणाचा अर्ज बाद ठरतो आणि कुणाची उमेदवारी सुरक्षित राहते याकडे लक्ष लागून राहिले आहे. त्यानंतरच माघारीच्या मोर्चेबांधणीला वेग येईल असे चित्र आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'रन फॉर युनिटी' रॅली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाची अखंडता, एकता आणि एकात्मता अबाधित राखण्याचा संदेश देत शिवाजी विद्यापीठात आज सकाळी 'रन फॉर युनिटी' रॅलीचे आयोजन करण्यात आले. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशभरात राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून रॅलीस प्रारंभ करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपासून संपूर्ण कॅम्पसमध्ये ही फेरी काढण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर सांगता झाल्यानंतर विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सहभागींना एकता व एकात्मतेची शपथ दिली. रॅलीमध्ये प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकाचे म्हैसूर येथील राष्ट्रीय परिषदेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी अनिस असिफ शेख यांनी म्हैसूर येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेतील पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. म्हैसूर (कर्नाटक) येथील विद्याविकास इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (व्ही.व्ही.आय.ई.टी.) या संस्थेत २६ ते २८ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत न्यूक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने 'सॉलिड स्टेट न्यूक्लिअर डिटेक्टर्स'या विषयावर विसावी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत अनिस असिफ शेख यांनी सुपर-कॅपॅसिटरचे अणुउद्योगातील वाढते महत्त्व या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# म्हैसूरमधील राष्ट्रीय परिषदेत शेख प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी अनिस़ असीफ शेख याने म्हैसूर येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेतील पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. म्हैसूर (कर्नाटक) येथील विद्या विकास इन्स्टिट्युट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (व्हीव्हीआयइटी) या संस्थेत न्यूक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडियाच्या सहकार्याने 'सॉलिड स्टेट न्यूक्लिअर डिटेक्टर्स' या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. परिषदेत अनिस शेख याने 'सुपर-कॅपॅसिटरचे अणुउद्योगातील वाढते महत्त्व' या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन केले. कुवेंपू विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. पी. वेंकटरामय्या यांच्या हस्ते शेख यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

## बॉक्सिंगमध्ये यश

कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत नाईट फाईट क्लबचे खेळाडू किशोर चव्हाण, सिद्धेश फोंडके, अनिकेत मोरे, स्तवन सोरटे यांनी सुवर्ण पदकांची कमाई केली. संदेश फोंडके व सैल मुल्लाणी यांनी रौप्य व ब्राँझपदक मिळवले. त्यांना मनोज घाटगे, नितीन गायकवाड यांचे मार्गदर्शन तर हिंद केसरी विनोद चौगुले यांचे प्रोत्साहन लाभले.